**श्री. रावसाहेब शंकर फुगारे,सहाय्यक लेखाधिकारी जि.प.सा.बां.उत्तरविभाग अहिल्यानगर यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत.**

अहिल्यानगर जिल्हा परिषद
अर्थ विभाग
आदेश क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/४२७/२०२५
अहिल्यानगर दिनांक ०९/१०/२०२५

वाचा:-१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/४१९/२०२४ दिनांक ०३/१२/२०२४

२.चौकशी समिती अहवाल जा.क्र.अहिल्यानगर/चौकशी/१८/२०२४ दिनांक ०३/०१/२०२५

३. इकडील ज्ञापन/दोषारोप पत्र क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/३१२/२०२५ दिनांक ०६/०८/२०२५

४. कार्यकारी अभियंता,जि.प.सा.बां.उत्तरविभाग,अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्रमांक बांध/आस्था-४/८७९/२०२५ दिनांक १९/०८/२०२५ अन्वये ज्ञापन/दोषारोप पत्राची सादर केलेली पोहच.

५. कार्यकारी अभियंता,जि.प.सा.बां.उत्तरविभाग,अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्रमांक बांध/आस्था-४/१०१६/२०२५ दिनांक १२/०९/२०२५ अन्वये सादर केलेला श्री.फुगारे यांचा खुलासा

६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (३) व (५) नुसार

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग,अहिल्यानगर या कार्यालयात आर्थिक अनियमितता झालेचे प्रथम दर्शनी निदर्शनास आलेनंतर संशयीत अपहार प्रकरणी संदर्भ क्रमांक १ अन्वये चौकशी समिती नियुक्त करुन जि.प.सा.बां.उत्तरविभाग,अहिल्यानगर येथील लेखाविषयक व अन्य दप्तर तपासणीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. व त्याप्रमाणे संबधित गठीत समितीने प्रस्तुत चौकशी संदर्भ क्रमांक २ अन्वये कार्यालयास सादर केलेला आहे. त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी संबधित कार्यालयात रोखपाल व कपातींचा भरणा करणे व अनुषंगीक कामकाज पाहणारे श्री.रोहीत शशिकांत रणशूर कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांनी व त्यांचेपूर्वी सदरचा पदभार सांभाळणारे व त्यानंतरही अनधिकृतरित्या सदरचे कामकाज करणारे श्री.अशोक अंबादास पंडीत,वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी कार्यभार हस्तांतरीत न करणे,शासकीय दस्तऐवज अनधिकृत रित्या अन्य कर्मचारी यांचे ताब्यात देणे व इतर विभागाचे कर्मचारी यांनी स्वत:जवळ बाळगणे,कपांतीच्या रकमा स्वत:च्या पॅन क्रमांकावर जमा करणे,शासकीय रकमेच्या कपातीचे धनाकर्ष ची रक्कम स्वत: च्या खातेमध्ये जमा करणे,न वटविलेल्या कपातीचे धनाकर्ष स्वत:जवळ ठेवणे तसेच खोटे दस्तऐवज तयार करुन खोटया स्वाक्ष-या करुन स्वत:च्या खात्यावर रकमा जमा करणे इ.प्रकारचे गैरवर्तन करुन मोठया प्रमाणात शासकीय रकमेचा अपहार केलेचे निदशनास आलेले आहे.व त्याबाबत संबधितांना पदावरुन तात्पुरते दूर करण्यात येऊन त्यांचेबाबत विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

प्रस्तुत प्रकरणी मोठया प्रमाणातील शासकीय रकमेचा अपहार झालेल्या जि.प.सा.बां.उत्तरविभागाकडे लेखा शाखेचे पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून श्री.रावसाहेब शंकर फुगारे हे सहाय्यक लेखाधिकारी या पदावर कार्यरत होते व आहेत.सबब श्री.फुगारे यांनी शिथील पर्यवेक्षण केलेप्रकरणी आणि शासकीय नियमांचे आदेशांचे व अनुदेशांचे पालन न करण्याबददल व परिणामत: सरकारी पैशांची अफरातफर करणे सुकर केल्याबददल,पर्यवेक्षी अधिका-याची जबाबदारी निश्चित करणेकामी विभागीय चौकशी नियमपुस्तिका प्रकरण तीन नियम क्रमांक ३.१० (दोन) मधील तरतूदीनुसार त्यांचेविरुध्द संदर्भ क्रमांक ३ अन्वये दोषारोप पत्र बजावण्यात आलेले होते.

प्रस्तुत संदर्भ क्र.३ अन्वयेचे ज्ञापन दोषारोप श्री.फुगारे यांना संदर्भ क्र. ४ अन्वये बजाविण्यात आलेले आहे.व श्री.फुगारे यांना सदर दोषारोप पत्र प्राप्त झालेपासून १० दिवसांचे आत बचावाचे निवेदन सादर करणेबाबत फर्माविण्यात आलेले होते.

संदर्भ क्रमांक ५ अन्वये प्राप्त पत्रानुसार श्री.फुगारे यांनी सादर केलेले बचावाचे निवेदन इकडेस सादर करण्यात आलेले आहे.सदर बचावाचे निवेदनाप्रमाणे श्री.फुगारे यांनी त्यांचेविरुध्द बजावणेत आलेले सर्व आरोप अमान्य केलेले आहेत.

त्यानुसार श्री.फुगारे यांनी त्यांचेविरुध्द निश्चित केलेले सर्व आरोप अमान्य केलेले असल्याने श्री. रावसाहेब शंकर फुगारे, सहाय्यक लेखाधिकारी, जि.प.सा.बां.उत्तरविभाग,अहिल्यानगर यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३) व (५) च्या व विभागीय चौकशी नियमपुस्तिका प्रकरण तीन नियम क्रमांक ३.१० (दोन) मधील तरतूदीनुसार खातेनिहाय विभागीय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. व सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी),आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येत आहे. विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन **श्री. जरे संभाजी अण्णासाहेब, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उत्तरविभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर** यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे.त्याप्रमाणे संदर्भ क्र.२ व ३ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्र.तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक २०२५१००९०५००५७ असा आहे.

Signed by Anand Subhashlal Bhandari
Date: 09-10-2025 21:00:19

(आनंद भंडारी)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति,**

१. प्रतः-विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग,नाशिक.सोबत संबधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते ८०.

२. श्री.जरे संभाजी अण्णासाहेब, कनिष्ठ प्रशासन अधिकारी,सार्वजनिक बांधकाम उत्तरविभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

३. व्दारा व प्रत- कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम उत्तरविभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

२/-सदर आदेशाची प्रत श्री.जरे संभाजी अण्णासाहेब, कनिष्ठ प्रशासन अधिकारी,यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.सोबत संबधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते --८०.

४. श्री. रावसाहेब शंकर फुगारे,सहाय्यक लेखाधिकारी,जि.प.सा.बां.उत्तरविभाग,अहिल्यानगर

व्दारा :- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बां.उत्तरविभाग,अहिल्यानगर

२/-सदर आदेशाची प्रत श्री.रावसाहेब शंकर फुगारे,सहाय्यक लेखाधिकारी यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.